# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

---

जळगाव दि. १३ (प्रतिनिधी) : विद्यापीठातील जनसंवाद आणि पत्रकारिता विभागाची विद्यार्थिनी वैशाली नाना पाटील हिला कुलगुरु प्रा.व्ही. एल. माहेश्वरी यांच्याहस्ते खान्देशातील आद्य महिला पत्रकार कै.कमलाबाई चौघुले स्मृती पुरस्कार प्रदान करण्यात आला.

विद्यापीठाच्या जनसंवाद आणि पत्रकारिता विभागातील एमए.एमसीजे या विषयात वैशाली नाना पाटील ही मागील वर्षी विद्यार्थिनींमधून विद्यापीठात प्रथम आल्याबद्दल १३ जुलै रोजी कुलगुरुंच्या दालनात पुरस्कार वितरण करण्यात आले. कुलगुरु प्रा.व्ही. एल. माहेश्वरी यांनी वैशाली पाटील हिला प्रमाणपत्र, स्मृतीचिन्ह व पुरस्कार रक्कमेचा धनादेश यावेळी दिला. याप्रसंगी विद्यापिठाचे प्र-कुलगुरु प्रा.एस.टी.इंगळे, प्रभारी कुलसचिव प्रा. किशोर पवार, प्रभारी वित्त व लेखाधिकारी सोमनाथ गोहिल, कला व मानव्यविद्या प्रशाळेचे संचालक प्रा.डॉ. अनिल चिकाटे, विभागप्रमुख प्रा.डॉ. सुधीर भटकर व डॉ. विनोद निताळे उपस्थित होते.

जनसंवाद आणि पत्रकारिता विषयात विद्यापीठातून प्रथम येणाऱ्या विद्यार्थीनीला खान्देशातील आद्य महिला पत्रकार कै.कमलाबाई चौघुले स्मृती पुरस्कार दरवर्षी देण्यात येतो. कै.कमलाबाई चौघुले यांचे सुपुत्र विजय चौघुले यांनी विद्यापीठाला दिलेल्या देणगीतून या पुरस्काराची रक्कम, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र विद्यार्थीनीला देण्यात येते. या वर्षी हा पुरस्कार वैशाली पाटील या विद्यार्थीनीला मिळाला असून यापूर्वी पदवीप्रदान समारंभात जनसंवाद आणि पत्रकारिता विषयात सुवर्णपदक देखील तिला मिळालेले आहे. पुरस्कारानिमित्त उपस्थितांनी वैशाली पाटीलचे अभिनंदन केले आहे.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२२ दिनांक: १३ जुलै, २०२२

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय देनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी